Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX | ISSUE- III | MARCH | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# प्रधानमंत्री मुद्रा योजना : एक अर्थशास्त्रीय अभ्यास

**प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा,जिल्हा-लातूर,महाराष्ट्र.

**सारांश**

*"देशाच्या विकेंद्रीत आर्थिक विकासात लघु उद्योगाचे अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. देशातील लघु व कुटीर उद्योगामुळे समन्यायी आर्थिक विकास साध्य करण्यात, रोजगार निर्मितीमध्ये,भांडवल निर्मितीमध्ये,स्थानिक संसाधनाचा पर्याप्त वापर करण्यामध्ये, निर्यातीमध्ये तसेच प्रादेशिक असमतोल दूर करण्यामध्ये लघु व कुटीर उद्योग तसेच स्थानिक लहान आस्थापना व व्यवसायांची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. अलीकडच्या काळात जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित, प्रचंड भांडवल असलेल्या मोठ्या उद्योगाची संख्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वाढत चालली आहे.मोठे उद्योग हे भांडवल प्रधान व संख्येने कमी व नफा केंद्रित असल्यामुळे बाजारपेठेतील स्पर्धात्मकतेमध्ये त्यांच्यासमोर लघु व कुटीर उद्योग तग धरत नाहीत. परिणामी अर्थव्यवस्थेवर त्याचा गंभीर परिणाम होतो.हे लक्षात घेऊन देशातील लघुउद्योग, लहान व्यवसायिक व अस्थापना यांना भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या लघु वित्त संस्थांना पुनर्वित्तपुरवठा करून अधिक मजबूत करणे यासाठी 8 एप्रिल 2015 रोजी प्रधानमंत्री मुद्रा योजनेची सुरुवात करण्यात आली. या योजनेद्वारे निश्चितच राष्ट्रीय उत्पन्न,दरडोई उत्पन्न, रोजगार निर्मिती,निर्यात, महिला सशक्तिकरण अनुसूचित जाती व जमातींमधील उद्योजकता वाढीसाठी मदत होऊन,पर्यायाने राष्ट्राच्या समतोल आर्थिक विकासास निश्चितच मदत होईल."*

**प्रस्तावना**

भारत हा एक विकसनशील देश आहे.जागतिक एकूण भू-क्षेत्रफळाच्या 2.4% क्षेत्र हे भारताकडे आहे.जागतिक एकूण लोकसंख्येच्या सुमारे 18%(142 कोटी) लोकसंख्या भारतामध्ये वास्तव्यास आहे.भारतामधील गरिबी, दारिद्य, बेरोजगारी, कुपोषण, आरोग्य शिक्षण, वीज, प्रदूषण, सामाजिक अशांतता, गुन्हेगारी या सर्व प्रश्नाचे मूळ हे बेसुमार वाढती लोकसंख्या आहे.कोणत्याही देशाचा गतिमान आर्थिक विकास हा त्या देशातील मानवी भांडवलाच्या दर्जावर व कार्यकारी लोकसंख्येवर अवलंबून असतो.देशामधील मूलभूत प्रश्नांची सोडवणूक झाली की देश विकासाच्या मार्गावर गतिमान मार्गक्रमण करू शकतो. परंतु अजूनही भारतामध्ये आर्थिक विकल्पातील गुंतवणूक अत्यंत कमी असून लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक विकल्पाचा पुरवठा करण्यास आपली अर्थव्यवस्था कमी पडत आहे. देशाच्या आर्थिक विकासात कृषी,उद्योग व सेवा क्षेत्राची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे.

औद्योगिक क्षेत्रांतर्गत लघुउद्योग हे देशांमध्ये प्रादेशिक समतोल साध्य करण्याबरोबरच उद्योगाचे विकेंद्रीकरण करून,स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण करून देण्यामध्ये व स्थानिक संसाधनाचा पर्याप्त वापर करण्यामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका निभवतात. देशामध्ये 60 दशलक्ष लोकांना रोजगार उपलब्ध करण्यामध्ये,जीडीपी मध्ये सुमारे 33%तर निर्यातीमध्ये 40% योगदान हे भारतातील लघु उद्योगांचे आहे.आजच्या काळात नवीन आर्थिक धोरणामुळे पर्यायाने जागतिकीकरणामुळे अतिउच्च तंत्रज्ञानावर आधारित, प्रचंड भांडवल घेऊन मोठे उद्योग हे भारतामध्ये उत्पादन करीत आहेत. त्यासमोर स्पर्धात्मकतेमध्ये लघुउद्योग तग धरणे अत्यंत कठीण आहे.देशाच्या समतोल आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करणारे क्षेत्र म्हणजे लघुउद्योग व लहान व्यवसायिक होय. देशातील लघुउद्योग व लहान व्यवसायिक क्षेत्राला पुनर्वित्त

पुरवठा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला पाहिजे.या उद्देशाने भारत सरकारने 8 एप्रिल 2015 रोजी प्रधानमंत्री मुद्रा योजना (Micro Units Development Refinance Agency) सुरू केली.वर्ष 2015-16 च्या वार्षिक अर्थसंकल्पात अर्थमंत्री अरुण जेटली यांनी मुद्रा बँकेची घोषणा केली व त्यासाठी अर्थसंकल्पात 20,000 कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली.प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत राज्यांबरोबर भागीदारी करून लघुउद्योगांना अर्थ पुरवठा करणाऱ्या लाघुवित्तीय संस्थांना विकसित करण्याच्या हेतूने मुद्रा बँकेची निर्मिती करण्यात आली. पंतप्रधान मुद्रा योजना ही मुद्रा बँक नसून, ती एक अर्थ पुरवठा करणारी संस्था आहे. तिला एका वित्तीय कंपनीचे स्वरूप देण्यात आले आहे. परंतु भविष्यामध्ये या योजनेला बँकेचा दर्जा देण्यात येऊ शकतो. त्यामुळे मुद्रा बँक या नावाने या योजनेला ओळखले जाते.या संस्थेची सुरुवातीचे भांडवल 20,000 कोटी रुपयाचे आहे.तसेच 3,000 कोटीची क्रेडिट गॅरंटी मिळेल अशा प्रकारचा वित्तपुरवठा मुद्राला विविध बँकांकडून होईल.सध्या मुद्रा बँक एनबीएफसी Non- Banking financial companies NBFC स्वरूपात काम करत आहे. पंतप्रधान मुद्रा योजनेच्या पुनर्वित्त पुरवठ्याचा आराखडा ठरला असून, योजनेअंतर्गत शिशु उद्योगासाठी-50,000 , किशोर उद्योगासाठी-50,000 ते 5 लाख,व तरुण उद्योगासाठी-5 ते 10 लाख कर्ज पुरवठा करण्यात येतो. मुद्रा बँक केंद्र सरकारची असून राज्य सरकारच्या अर्थ पुरवठा करणारे संस्थेची संपर्क साधून संपूर्ण देशात आपले जाळे निर्माण करत आहे.

**शोध निबंधाचे महत्त्व**

देशातील ज्वलंत आर्थिक प्रश्न (बेरोजगारी,दारिद्र्य,कुपोषण,उद्योगाचे केंद्रीकरण, उद्योगांना भांडवल पुरवठ्याचा अभाव,सामाजिक अशांतता व गुन्हेगारी)निर्मूलनासाठी पंतप्रधान मुद्रा योजनेद्वारे नेमका पुनर्वित्तपुरवठ्याचा कोणता आराखडा तयार करण्यात आला आहे? देशातील लघुउद्योजक,लहान व्यवसायिक व लहान आस्थापना,महिला उद्योजक अनुसूचित जाती व जमातीतील उद्योजकांना विकासाच्या प्रवाहात आणणे यासाठी योजनेअंतर्गत कोणत्या एजन्सीजच्या माध्यमातून किती पुनर्वित्त पुरवठा करण्यात येणार आहे? रोजगार निर्मिती,लघु उद्योगातील उत्पादन व उत्पादकता वाढवणे, निर्यात वाढवणे,आर्थिक विकासाची गती सुधारणे यासाठी मुद्रा योजना हा संशोधनाचा विषय ठरतो.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**शोध सामुग्री**

शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये विशेषता शासकीय व निमशासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ,मासिके,पाक्षिके,साप्ताहिके,वर्तमानपत्रे शासनाचे संबंधित विभागाचे अहवाल इत्यादीचा आधार घेतला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंधाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत.

1) पंतप्रधान मुद्रा योजनेच्या कार्यपद्धतीचा शोध घेणे.
2) पंतप्रधान मुद्रा योजनेची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
3)पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत केलेल्या पुनर्वित्तपुरवठ्याचा शोध घेणे.
4) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

**पंतप्रधान मुद्रा योजनेची कार्य**

1) सूक्ष्म व लघुसंस्थांच्या वित्त व्यवसाय करिता मार्गदर्शन तत्वे तयार करणे
2) लघु वित्तीय संस्थांची नोंदणी करणे
3) लघु वित्तीय संस्थांचे नियमन करणे
4) लघु वित्तीय संस्थांची मान्यता व गुणवत्ता परीक्षण करणे तसेच त्यासंबंधी मानके तयार करणे.
5) कर्जबाजारीपणापासून वाचविण्यासाठी व ग्राहकांच्या अधिकाराचे योग्य संरक्षण करणे.
6) कर्ज वसुलीच्या पद्धती निश्चित करण्याची जबाबदारी असलेल्या वित्त व्यवस्था तयार करणे.
7) सर्व सूक्ष्म लघु उद्योगांना अनुबंधासहित कर्ज देणे.
8) कर्जासाठी योग्य पर्यायांना प्रोत्साहन देणे.
9) सूक्ष्म उद्योगासाठी दिल्या जाणाऱ्या कर्जासाठी हमी देण्याकरिता कर्ज हमी योजनेची व्यवस्था व तिचे संचालन करणे.

10) पंतप्रधान मुद्रा योजना अंतर्गत सूक्ष्म व्यावसायिकापर्यंत कर्ज पोहोचविण्यासाठी रचना तयार करणे व निश्चित रचनेनुसार कार्य करणे.

**पंतप्रधान मुद्रा योजनेची वैशिष्ट्ये**

1) मुद्रा योजनेअंतर्गत लघु उद्योगांना 50,000 ते 10 लाख रुपयापर्यंत अर्थ पुरवठा करण्यात येतो.
2) मुद्रा बँक हि लघुवीत्त पुरवठा संस्थांना पुर्नवित्त पुरवठा करेल त्यामुळे प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत लहान उद्योगांना पर्याप्त कर्ज देण्याचे प्रमाण सुधारेल.
3) मुद्रा योजनेच्या अंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उद्योजकांना प्राधान्याने कर्ज देण्यात येते.
4) मुद्रा योजनेच्या क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी डाक विभागाच्या नेटवर्कचा वापर करण्यात येतो.
5) मुद्रा बँकेमध्ये देशातील 5.77 कोटी लघुउद्योजकांना वित्तीय सहाय्य देण्यात येत आहे.
6) या योजनेअंतर्गत शिशु, किशोर आणि तरुण ऋण असे तीन प्रकारची कर्जे देण्यात येतात.
7) मुद्रा योजनेच्या साह्याने युवा,शिक्षित आणि प्रशिक्षित उद्योजकांना आर्थिक प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.
8) या योजनेमार्फत रोजगार निर्मिती व स्वयंरोजगारास प्रोत्साहन देण्यात येत आहे.
9) पंतप्रधान मुद्रा योजनेमुळे स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन सखल घरेलू उत्पादन वाढवणे आणि जलद आर्थिक वृद्धी साध्य करण्यास मदत होत आहे.
10)महिला उद्योजकांना उद्योजकीय प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्राधान्याने या योजनेअंतर्गत कर्ज दिले जाते.
11) निम्न स्तरावरील उद्योजकासाठी मुद्रा बँक वेगवेगळ्या एनजीओ चे सहकार्य घेते.

अशाप्रकारे मुद्रा योजनेची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत.यामुळे देशाच्या आर्थिक विकासामध्ये व प्रादेशिक समतोल विकास साध्य करण्यामध्ये, रोजगार निर्मितीमध्ये, महिला उद्योजकांना,अनुसूचित जाती व जमातीतील उद्योजकांना विकासाच्या प्रवाहामध्ये समाविष्ट करण्याच्या दृष्टीने पंतप्रधान मुद्रा योजनेचे विशेष महत्त्व आहे.

पंतप्रधान मुद्रा योजना अंतर्गत शिवणकाम,भरतकाम,लहान मेकॅनिक,लहान हॉटेल, न्हावी, धोबी, कुंभार, चर्मोद्योग,वीटकाम,मातीकाम, ब्युटी पार्लर, मत्स्य उद्योग तसेच लहान प्रकारचे फेर विक्री दुकानदार सुतार,गवंडीकाम,शिंपी,भाजीपाला व फळ विक्रेते अशा लघु उद्योगांना वित्त पुरवठा प्राधान्याने करण्यात येतो.

**प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत खातेधारकांची संख्या**

(2016-17 ते 2020-21)

| **वर्ष** | **शिशु कर्ज** | | **किशोर कर्ज** | | **तरुण कर्ज** | | **एकूण मुद्रा कर्ज** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खातेधारक | एकूण शी प्रमाण | खातेधारक | एकूण खात्याशी प्रमाण | खातेधारक | एकूण खात्याशी प्रमाण | एकूण खातेधारक | एकूण खात्याशी प्रमाण |
| 2016-17 | 3,64,97,813 | 92% | 26,63,502 | 7% | 5,39,732 | 1% | 3,97,01,047 | 100% |
| 2017-18 | 4,26,69,795 | 89% | 46,53,874 | 9% | 8,06,924 | 2% | 4,81,30,593 | 100% |
| 2018-19 | 5,15,07,438 | 86% | 66,06,009 | 11% | 17,56,871 | 3% | 5,98,70,318 | 100% |
| 2019-20 | 5,44,90,613 | 88% | 64,71,873 | 10% | 12,85,116 | 2% | 6,22,47,606 | 100% |
| 2020-21 | 4,01,80,115 | 79% | 94,86,160 | 19% | 10,68,771 | 2% | 5,07,35,046 | 100% |
| **सरासरी** | 4,50,69,155 | 85% | 59,76,283 | 13% | 10,91,483 | 2% | 5,21,36,922 | 100% |

वरील सारणीमध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत वर्ष 2016-17 ते वर्ष 2020- 21 या कालावधीत कार्यरत खातेधारकांची संख्या दर्शविण्यात आली आहे.या

योजनेअंतर्गत नोंदणीकृत एकूण खातेदारांपैकी शिशु कर्ज खातेधारक सरासरी -4,50,69,155 (85%) , किशोर कर्ज खातेधारक सरासरी 59,76,283(13%) व तरुण कर्ज खातेधारक सरासरी 10,91,483(2%)पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत मागील पाच वर्षात सरासरी 5,21,36,922 खाते उघडण्यात आल्याचे निर्दशनास येते.

**पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत वित्त पुरवठा**(2016-17 **ते** 2020-21) ( **कोटी रुपये**)

| **वर्ष** | **शिशु कर्ज** | | **किशोर कर्ज** | | **तरुण कर्ज** | | **एकूण मुद्रा कर्ज** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वितरित कर्ज | एकूण कर्जाशी प्रमाण | वितरित कर्ज | एकूण कर्जाशी प्रमाण | वितरित कर्ज | एकूण कर्जाशी प्रमाण | वितरित कर्ज | एकूण कर्जाशी प्रमाण |
| 2016-17 | 85,100.74 | 47.14% | 53,545.14 | 29.66% | 41,882.66 | 23.20% | 1,80,528.54 | 100% |
| 2017-18 | 1,06,001.06 | 41.78% | 86,732.15 | 34.19% | 60,943.36 | 24.02% | 2,53,677.11 | 100% |
| 2018-19 | 1,42,345.25 | 44% | 1,04,386.68 | 32% | 74,990.86 | 23% | 3,21,722.79 | 100% |
| 2019-20 | 1,63,559 | 48% | 95,579 | 28% | 78,358 | 24% | 3,37,496 | 100% |
| 2020-21 | 1,09,953 | 34% | 1,32,516 | 41% | 79,290 | 25% | 3,21,759 | 100% |

वरील सारणीमध्ये वर्ष 2016-17 ते वर्ष 2020-21या कालावधीमध्ये देशांमध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत केलेल्या वित्त पुरवठ्याची स्थिती दर्शविण्यात आली आहे.मुद्रा योजनेअंतर्गत वितरित केलेल्या एकूण कर्जापैकी.वर्ष 2016-17 मध्ये शिशु कर्ज 85,100.74 कोटी रुपये वितरित केले होते तर यामध्ये वाढ होऊन वर्ष 2020-21 मध्ये 1,09,953 कोटी रुपये कर्ज वितरित केल्याचे दिसून येते.किशोर कर्ज वर्ष 2016-17 मध्ये 53,545.14 कोटी रुपये वितरित करण्यात आले होते तर वर्ष 2020-21 मध्ये किशोर कर्जाचे प्रमाण वाढून 1,32,516 कोटी रुपये झाल्याचे दिसून येते.तसेच 2016-17 मध्ये तरुण कर्ज 41,882.66 कोटी रुपये वितरित केले होते तरी यामध्ये वाढ होऊन वर्ष 2020-21 मध्ये 79,290 कोटी रुपये वितरित केल्याचे दिसून येते.पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत वर्ष 2016-17 मध्ये 1,80,528.24 कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले होते यामध्ये सातत्याने वाढ होऊन वर्ष 2020-21 मध्ये 3,21,759 कोटी रुपये कर्ज वितरण केल्याचे निर्दशनास येते.

पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत लघुउद्योगांना, लहान व्यवसायिकांना, महिला उद्योजकांना, अनुसूचित जाती व जमातीतील उद्योजकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी, लघुउद्योजकांना पुनर्वित्तपुरवठा करण्यासाठी स्वयंसहायता गट, गैर बँकिंग वित्तीय कंपन्या, ट्रस्ट आणि सोसायटी यांना कर्ज पुरवठा करण्यात येतो.या योजनेअंतर्गत शिशू ,किशोर व तरुण कर्ज या प्रकारचा कर्ज पुरवठा करण्यात येतो.

**संस्था निहाय मंजूर राशी** 2020- 21( **कोटी रुपये**)

| **अ. क्र.** | **संस्था** | **मंजूर राशी** |
|---|---|---|
| 1 | सार्वजनिक क्षेत्रातील बँका समाविष्ट प्रादेशिक ग्रामीण बँका | 1,30,185.60 |
| 2 | खाजगी क्षेत्रातील बँका समाविष्ट विदेशी बँका | 93,342.02 |
| 3 | लघु वित्त बँका | 19,646.68 |
| 4 | सूक्ष्म वित्त संस्था | 46,601.40 |
| 5 | बगर बँकिंग वित्त कंपन्या | 31983.17 |
| 6 | राज्य सहकारी बँका | 0.4 |
| | एकूण | 3,21,759.30 |

वरील सारणीमध्ये वर्ष 2020- 21 मध्ये पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत संस्थानिहाय मंजूर कर्ज रक्कम दर्शविण्यात आली आहे.वर्ष 2020 -21 या आर्थिक वर्षांमध्ये मुद्रा योजनेअंतर्गत मंजूर कर्ज रकमेपैकी, सार्वजनिक क्षेत्रातील बँका (1,30,185.60 कोटी)खाजगी क्षेत्रातील बँका(93,342.02 कोटी)लघुवीत्त बँका(19646.68 कोटी)सूक्ष्म वित्त संस्था(46,601.40 कोटी) बगर बँकिंग वित्त कंपन्या(31,983.17 कोटी)राज्य सहकारी बँका(0.4 कोटी) यांना अशी एकूण 3,21,759.30 कोटी रुपयांची कर्जराशी मंजूर करण्यात आली आहे.

**विभाग निहाय वितरित मुद्रा कर्ज 2020- 21**
**( कोटी रुपये)**

| **अ. क्र.** | **विभाग** | **मंजूर रक्कम कोटी** | **एकूण मंजूर कर्ज रक्कमेशी प्रमाण %** |
|---|---|---|---|
| 1 | उत्तर | 78,555 | 24 |
| 2 | पूर्व | 85,472 | 27 |
| 3 | उत्तर पूर्व | 11,511 | 4 |
| 4 | दक्षिण | 90,325 | 28 |
| 5 | पश्चिम | 55,897 | 17 |
| | एकूण | 3,21,759.25 | 100 |

वरील सारणीमध्ये पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत वर्ष 2020-21 मध्ये विभागनिहाय मंजूर मुद्रा कर्जाची स्थिती दर्शविण्यात आली आहे.उत्तर विभागासाठी 78,555 कोटी रुपये (24%), पूर्व विभागासाठी 85,472 कोटी रुपये (27%), उत्तर पूर्व विभागासाठी 11,511 कोटी रुपये (4%), दक्षिण विभागासाठी 90.325 कोटी रुपये (28%) व पश्चिम विभागासाठी 55,897 कोटी रुपये (17%) असे एकूण सदरील वर्षात 3,21,759.25 कोटी रुपये विभाग निहाय मुद्रा कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

**कर्जदाराच्या उप श्रेणी नुसार मंजूर कर्ज राशी** 2020-21( **कोटी रुपये**)

| **श्रेणी** | **शिशु कर्ज** | **किशोर कर्ज** | **तरुण कर्ज** | **एकूण कर्ज** |
|---|---|---|---|---|
| **जनरल** | 52,164 | 94,426 | 69,353 | 2,15,942 (67%) |
| **एससी** | 19,714 | 9,430 | 1,680 | 30,824 (10%) |
| **एसटी** | 7,218 | 4,344 | 1,168 | 12,730 (4%) |
| **ओबीसी** | 30,857 | 24,317 | 7,089 | 62,263 (19%) |
| **एकूण** | 1,09,953 | 1,32,516 | 79,290 | 3,21,759 |
| **वरीलपैकी** | | | | |
| **महिला उद्योजक** | 74,490 | 50,731 | 6,082 | 1,31,303 (41%) |
| **नवीन उद्योजक** | 13,439 | 34,562 | 35,336 | 83,337 (26%) |
| **अल्पसंख्यांक** | 8,004 | 15,260 | 3,653 | 26,917 (8%) |

वरील सारणी मध्ये वर्ष 2020-21 मध्ये कर्जदाराच्या उपश्रेणीनुसार/ संवर्गानुसार मुद्रा योजनेअंतर्गत मंजूर कर्जाची स्थिती दर्शविण्यात आली आहे.पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत शिशु कर्ज, किशोर कर्ज, तरुण कर्जाची मंजुरी व वितरण दर्शविण्यात आली आहे कर्ज. वर्ष 2020- 21 मध्ये खुल्या संवर्गासाठी 2,15,942 कोटी रुपये (67%) एससी संवर्गासाठी 30,824 कोटी रुपये (10%) एसटी संवर्गासाठी 12,730 कोटी रुपये (4%) ओबीसी संवर्गासाठी 62,263 कोटी रुपये (19%)असे एकूण 3,21,759 कोटी रुपये कर्ज मंजूर करण्यात आले आहे. वर्ष 2020-21 मध्ये मंजूर एकूण मुद्रा कर्जापैकी महिला उद्योजकांसाठी 1,31,303 कोटी रुपये(41%) नवीन उद्योजकासाठी 83,337 कोटी रुपये(26%)अल्पसंख्यांक समुदायातील व्यावसायिकासाठी 26,917 कोटी रुपये(8%)असे संवर्गनिहाय कर्ज मंजुरीचे व वितरणाचे प्रमाण होते.

## निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आले आहेत व शिफारशी करण्यात आले आहेत ते पुढील प्रमाणे...

1) पंतप्रधान मुद्रा योजना अंतर्गत लघुउद्योग, लहान व्यवसायिक, लहान नवीन उद्योजक, महिला उद्योजक अनुसूचित जाती व जमातीतील उद्योजकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी, त्यांना उद्योगातील भांडवलाची कमतरता भरून काढण्यासाठी, लघु वित्तीय संस्थांना भांडवल पुरवठ्याच्या दृष्टीने अधिक मजबूत करण्यासाठी

शिशु कर्ज - 50,000 रुपये, किशोर कर्ज - 50,000 ते 5 लाख रूपये आणि तरुण कर्ज 5 लाख ते 10 लाख रुपये कर्ज पुरवठा करण्यात येतो.

2)पंतप्रधान मुद्रा योजना अंतर्गत शिवणकाम,भरतकाम,लहान मेकॅनिक,लहान हॉटेल, न्हावी, धोबी, कुंभार, चर्मोद्योग,वीटकाम,मातीकाम, ब्युटी पार्लर, मत्स्य उद्योग तसेच लहान प्रकारचे फेर विक्री दुकानदार सुतार,गवंडीकाम,शिंपी,भाजीपाला व फळ विक्रेते अशा लघु उद्योगांना वित्त पुरवठा प्राधान्याने करण्यात येतो.

3) प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत नोंदणीकृत एकूण खातेदारांपैकी शिशु कर्ज खातेधारक सरासरी - सरासरी -4,50,69,155 (85%) , किशोर कर्ज खातेधारक सरासरी 59,76,283(13%) व तरुण कर्ज खातेधारक सरासरी 10,91,483(2%) पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत मागील पाच वर्षात सरासरी 5,21,36,922 खाते उघडण्यात आले आहेत.

4) प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत वितरित केलेल्या एकूण कर्जापैकी.वर्ष 2016-17 मध्ये शिशु कर्ज 85,100.74 कोटी रुपये वितरित केले होते तर यामध्ये वाढ होऊन वर्ष 2020-21 मध्ये 1,09,953 कोटी रुपये कर्ज वितरित केल्याचे दिसून येते.किशोर कर्ज वर्ष 2016-17 मध्ये 53,545.14 कोटी रुपये वितरित करण्यात आले होते तर वर्ष 2020-21 मध्ये किशोर कर्जाचे प्रमाण वाढून 1,32,516 कोटी रुपये झाल्याचे दिसून येते.तसेच 2016-17 मध्ये तरुण कर्ज 41,882.66 कोटी रुपये वितरित केले होते तरी यामध्ये वाढ होऊन वर्ष 2020-21 मध्ये 79,290 कोटी रुपये वितरित केल्याचे दिसून येते.पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत वर्ष 2016-17 मध्ये 1,80,528.24 कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले होते यामध्ये सातत्याने वाढ होऊन वर्ष 2020-21 मध्ये 3,21,759 कोटी रुपये कर्ज वितरण केले आहे.

5) वर्ष 2020 -21 या आर्थिक वर्षांमध्ये मुद्रा योजनेअंतर्गत मंजूर कर्ज रकमेपैकी, सार्वजनिक क्षेत्रातील बँका (1,30,185.60 कोटी) खाजगी क्षेत्रातील बँका (93,342.02 कोटी) लघुवीत्त बँका (19,646.68 कोटी)सूक्ष्म वित्त संस्था(46,601.40 कोटी) बगर बँकिंग वित्त कंपन्या(31,983.17 कोटी) राज्य सहकारी बँका(0.4 कोटी) यांना अशी एकूण 3,21,759.30 कोटी रुपयांची कर्जराशी मंजूर करण्यात आली आहे.

6) पंतप्रधान मुद्रा योजना अंतर्गत वर्ष 2020 -21 मध्ये उत्तर विभागासाठी 78,55 कोटी रुपये (24%), पूर्व विभागासाठी 85,472 कोटी रुपये (27%), उत्तर पूर्व विभागासाठी 11,511 कोटी रुपये (4%), दक्षिण विभागासाठी 90,325 कोटी रुपये (28%) व पश्चिम विभागासाठी 55,897 कोटी रुपये (17%) असे एकूण सदरील वर्षात 3,21,759.25(100%) कोटी रुपये विभाग निहाय मुद्रा कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

7) पंतप्रधान मुद्रा योजना अंतर्गत वर्ष 2020- 21 मध्ये खुल्या संवर्गासाठी 2,15,942 कोटी रुपये (67%) एससी संवर्गासाठी 30,824 कोटी रुपये (10%) एसटी संवर्गासाठी 12,730 कोटी रुपये (4%) ओबीसी संवर्गासाठी 62,263 कोटी रुपये (19%)असे एकूण 3,21,759 कोटी रुपये कर्ज मंजूर करण्यात आले आहे. वर्ष 2020-21 मध्ये मंजूर एकूण मुद्रा कर्जापैकी महिला उद्योजकांसाठी 1,31,303 कोटी रुपये(41%) नवीन उद्योजकासाठी 83,337 कोटी रुपये(26%)अल्पसंख्यांक समुदायातील व्यावसायिकासाठी 26,917 कोटी रुपये(8%)असे संवर्गनिहाय कर्ज मंजुरीचे व वितरणाचे प्रमाण होते.

**शिफारशी**

1)देशातील वाढती लोकसंख्या बेरोजगारी,गरिबी, कुपोषण, प्रादेशिक असमतोल, स्थानिक संसाधनाचा महत्तम उपयोग इत्यादीसाठी पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत पुनर्वित्तपुरवठा करण्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या भांडवलाच्या प्रमाणात वाढ करणे गरजेचे आहे. यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनातून मुद्रा योजनेच्या भांडवलाच्या प्रमाणात मुबलक प्रमाणात वाढ करण्यात यावी.

2) प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत शिशु ,किशोर व तरुण अशा स्वरूपात सूक्ष्म वित्तीय संस्थांना पुनर्वित्तपुरवठा

पुरवठा करण्यात येतो. मुद्रा योजनेतील कर्जपुरवठ्याचा दर कमी करण्यात यावा जेणेकरून देशातील उद्योजकता वाढेल.तसेच देशातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकीय प्रशिक्षण प्रभावीपणे देऊन त्यांना पूर्णतः उद्योजक बनण्यास तांत्रिक व आर्थिक सहकार्य करण्यात यावे जेणेकरून देशातील गंभीर आर्थिक प्रश्न कमी होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची**

1) Mudra annual report 2016-17 to 2020 -21, corporate and registered office, MSME development centre, Bandra Mumbai.
2) Gupta S.,MUDRA -financial inclusion of the missing medal Indian journal of applied research 2015, 5(11).
3) Mol IP S. Financial inclusion concept and warrior in Indian context Abhinav international monthly refer journal of research in management and technology 2014
4) Rudrawar MAA,Uttarwar VR, An Evaluatory study of MUDRA scheme, International journal of multifaceted and multilingual studies 2016.
5) Kumar S. Impact of Mudra Yojana financial inclusion 6th international conference on recent trends in engineering, science and management, Punjab 2017.
6) https://www.mudra.org.in/
7) Deepti George, Pradhanmantri Mudra Yojana ( A critical analysis and a call for change) Economic & political Weekly,Vol-55, Issue No.7,15 Feb 2020,